महाराष्ट्र शासन
समाजिक न्याय व विशेष सहाय विभाग
# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सांगली
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुना बुधगावरोड, सांगली 416 416
दु.क्र. 0233-2374739 ई-मेल :- acsangli2016@gmail.com

जाक्र.सआसकसां/भासशि/महाडिबीटी/2022-23/ 5090 दि:- 27/09/2022

29

परिपत्रक

प्रति,
प्राचार्य,
------------------------------
------------------------------

**विषय** :- सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील महाडिबीटी पोर्टवरील अनु. जाती प्रवर्गाकरिता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती ऑनलाईन करावयाच्या अमंलबजावणीबाबत...

**संदर्भ** :- मा.सहआयुक्त(शिक्षण),समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. ३५७३ दि.२३.०९.२०२२

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविणेत येते कि, सर्व अनुदानित,विनाअनुदानित महाविदयालयात शिक्षण घेत असलेल्या अनु. जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजना, राजर्षी शाहु महाराज मॅट्रीकोत्तर गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकत असलेल्या मुलां-मुलींना निर्वाह भत्ता (विदयावेतन) या योजनांअंतर्गत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु झालेबाबत संदर्भिय परिपत्रकान्वये कळविणेत आलेले आहे. सदर परिपत्रकामध्ये नमुद सुचना खालील प्रमाणे,

| अ.क्र. | शैक्षणिक स्तर | अर्जाचा प्रकार | प्राप्त झालेले अर्ज ऑनलाईन अग्रेषित करण्याकरिता प्रस्तावित मुदत |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ महाविदयालयातील अभ्यासक्रम (उदा. इ.११ वी , १२ वी (सर्व शाखा), (उदा. इ.११ वी , १२ वी (MCVC,ITI), | नविन अर्ज | दि.२२.०९.२०२२ ते ०८.१०.२०२२ पर्यंत |
| | | नुतनिकरणाचे अर्ज | दि.२२.०९.२०२२ ते १५.१०.२०२२ पर्यंत |
| २ | वरिष्ठ महाविदयालयातील बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम (उदा. प्रथम, व्दितीय व तृतीय (सर्व शाखा- कला, वाणिज्य, विज्ञान इ.) | नविन अर्ज | दि.२२.०९.२०२२ ते २०.१०.२०२२ पर्यंत |
| | | नुतनिकरणाचे अर्ज | दि.२२.०९.२०२२ ते १५.१०.२०२२ पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | वरिष्ठ महाविदयालयातील व्यावसायिक अभ्यासक्रम (उदा. प्रथम, व्दितीय व तृतीय, अंतिम वर्ष (सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. अभियांत्रिकी, वैदयकिय,व्यवस्थापन अभ्यासक्रम, फार्मसी व नर्सिंग अभ्यासक्रम इ.) | नविन अर्ज | दि.२२.०९.२०२२ ते ०७.११.२०२२ पर्यंत |
| | | नुतनिकरणाचे अर्ज | दि.२२.०९.२०२२ ते ३१.१०.२०२२ पर्यंत |

उक्त नमुद तक्यानुसार सर्व महादियालयांनी नमुद दिनांकाच्या अधिन राहुन आपल्या महाविद्यालयातील पात्र मागासवर्गीय विदयार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन अग्रेषित करुन या कार्यालयस्तरावर पाठविणेची कार्यवाही करावी.

शासन निर्णय दि.८ जानेवारी २०१९ मध्ये नमुद अटी व शर्तीनुसार संबंधित महादियालयांनी आपल्या महाविदयालयात राबविण्यात येणा-या अभ्यासक्रमांची शिक्षण शुल्क मंजुरी, विदयापीठाव्दारे मंजुर होणा-या इतर शुल्क इत्यादी बाबींची मान्यता संबंधित सक्षम शैक्षणिक विभाग/ शासकिय यंत्रणेकडुन करावयाची जबाबदारी आपली राहील. तसेच आपल्या स्तरावर स्थापन असलेल्या "समान संधी केंद्राव्दारे" देखील विदयार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरणेस योग्य ती मदत करणेत यावी व याबाबत आपल्या सुचना फलकावर सुचना निर्गमित करुन त्याबाबतचे फलेक्स/होर्डींग महाविदयालयाच्या आवारात लावणेत यावेत सदर कार्यवाहीचे फोटो या कार्यालयाचे वरील नमुद ईमेल- acsangli2016@gmail.com वर पाठविणेत यावेत.

(जयंत चाचरकर)
सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण सांगली

**प्रत माहिस्तव सविनय सादर,**

1. मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
2. मा. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण पुणे विभाग पुणे